# भाजपाचे सरकार 'संप मोडू सरकार' म्हणून ओळखले जाईल

# हा सन्मान नव्हे ! मग्रूर, निष्क्रिय सरकारला दिलेली ही शिवी आहे

**संपादकीय**

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

ऐन दिवाळीत पुकारलेला एसटी कामगारांचा संप मागे घेतला गेला. पण ही आनंदाची बातमी नाही. एसटी कामगारांच्या मागण्या मान्य होऊन हा संप मागे घेतलेला नाही तर सरकारने आपली सर्व ताकद पणाला लावून संप मागे घेण्याची जबरदस्ती केली म्हणून संघटनांना नाईलाजाने संप मागे घ्यावा लागला. ज्या एसटी कामगारांनी अख्खी दिवाळी अंधारात घालवली त्यांच्या कपाळी आणखी एक समिती मारली गेली. वेतन निश्चितीसाठी यापूर्वी दोन समित्या होत्या त्यांची संख्या आता तीन झाली आहे. या तिसऱ्या समितीने अंतरिम अहवाल आणि अंतिम अहवाल कधी द्यायचा त्याच्या तारखा निश्चित केल्या आहेत. पण अशा तारखा कधीच पाळल्या जात नाहीत. त्यातूनही खरेच अहवाल तयार झाला तरी तो अहवाल पुढच्या संपापर्यंत धूळ खात राहणार हे सर्वांनाच माहीत आहे. कायद्याचा गैरवापर करीत संप बेकायदा ठरवून संप मोडण्याचे पाप या सरकारने केले. म्हणूनच संप मागे घेतल्याचा आनंद होत नाही, तर कामगारांच्या रास्त मागण्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या या सरकारचा राग येतो. आपण सरकारला मायबाप सरकार म्हणतो. कारण आपल्या समस्या सोडविण्याइतकी ताकद सरकार नावाच्या यंत्रणेत असते. पण हे सरकार 'मायबाप' सरकार नाही. हे सरकार 'संप मोडू सरकार' आहे आणि 'संप मोडू सरकार' असणे हे भूषण नाही तर लांच्छन आहे. सरकारी ताकद वापरून असे शंभर संप मोडाल, पण जर संपाचे कारण दूर केले नाहीत तर कामगारांच्या मनातील धगधगते निखारे पुन्हा पुन्हा पेटणारच आहेत.

शेतकऱ्यांच्या आंदोलनापासून एसटी कामगारांच्या संपापर्यंत एकच चित्र पाहायला मिळाले. सरकारने ताकद लावून संप मोडला आणि मूळ समस्या तशीच चिघळत ठेवली. कोणत्याही घटकाने आंदोलन सुरू केले की, आधी त्यांच्यावर आंदोलन मागे घेण्याचा दबाव आणायचा, त्यांनी ऐकले नाही तर ते आंदोलन विरोधकांनी पेटवले आहे असे चित्र निर्माण करायचे, पुढे आपली माणसं आंदोलनात घुसवायची, एकदोघांना न्यायालयात खटला दाखल करायला सांगायचे, सर्व बाजूंनी आंदोलकांना घेरून त्यांना घोषणेपुरती वाक्य म्हणायला लावायची आणि माघार घेणे भाग पाडायचे ही नेहमीची खेळी झाली आहे. मराठा आरक्षणासाठी महाराष्ट्र पेटला होता, त्याचा शेवट याच मार्गाने झाला. शेतकऱ्यांची हमीभावाची प्रमुख मागणी होती ती मान्य न होताच आंदोलनाचे तुकडे केले. अजून कर्जमाफी आणि कर्जमुक्तीचा तमाशा सुरू आहे. पण मूळ हमीभावाच्या मागणीचे काय केले? अंगणवाडीच्या महिला दर अधिवेशनात आंदोलन करतात. दरवर्षी मानधन वाढ, पोषण आहाराची रक्कम वेळेत देणे, अंगणवाडीचे भाडे वेळेत जमा होणे यासाठी सूत्र आखायला हवे. परंतु त्याची आखणीच होत नाही. त्यामुळे सतत आंदोलन करण्याची वेळ येते. बेस्ट उपक्रम तोट्यात का चालला आहे? हा तोटा कसा थोपवायचा? यावर एकही सरकारी बैठक होत नाही. पोलिसांच्या घरांबाबत निर्णय घेण्यासाठी सरकारने अधिवेशनात समिती स्थापन केली. मात्र त्यानंतर या समितीची एकही बैठक झाली नाही. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना नवा वेतन आयोग लागू करण्याची घोषणा डिसेंबरपर्यंत करू असे आश्वासन दिले आणि संप स्थगित करायला लावला. आता एक महिन्याने त्यांचा संप सुरू होईल आणि मग हे 'संप मोडू सरकार' पुन्हा संप मोडण्याच्या मागे लागेल. कुणीही काहीही मागणी केली की, तो सरकारचा विरोधक मानला जातो. त्याची वाट कशी लावायची याचा विचार सुरू होतो आणि त्याचा शेवट केल्यावर सरकार शांत होते. ही पद्धत राजकारणात चालत असेल. कामगारांच्या प्रश्नाबाबत हे धोरण चालूच शकत नाही. कारण सरकार कितीजणांची तोंडे दाबणार आहे? शेवटी मनातील अस्वस्थता, बेचैनी, राग कोणत्याही मार्गाने बाहेर पडतोच. कुणीही आंदोलन केले की, दोन-चार महिन्यांची मुदत मागायची नाहीतर समिती नेमायची ही केवळ मलमपट्टी आहे. जखम बरी व्हायला पाहिजे ती होतच नाही. काही आंदोलनात तर सरकारने तेवढीही तसदी घेतली नाही. आंदोलनांच्या मागण्या तत्त्वत: मान्य असल्याचे जाहीर करून फसविले. हा 'तत्त्वत:' प्रयोग एकदोनदा चालला, मात्र यात काही तथ्य नाही. हे आता सर्वांना कळले आहे.

जी आंदोलने झाली ती आंदोलने होण्यापूर्वी सरकारला त्यांचे प्रश्न माहीत असतात. कामगार संघटना निवेदने पाठवतात ती कचऱ्याच्या टोपलीत टाकली जातात, मुख्यमंत्र्यांना भेटीसाठी वेळ नसतो. प्रत्येक मंत्री म्हणतो की, आम्हाला सर्व समजते. तुम्ही आम्हाला शहाणपण शिकवू नका. या सरकारचे प्रतिनिधी तर उर्मटपणे सांगतात की, कोर्टात जा नाहीतर प्रेसकडे जा, आम्हाला फरक पडत नाही. हा असा सातत्याने अपमान सहन करूनही शेवटी चर्चा होतच नसल्याने नाईलाजाने संपाचे हत्यार उचलावे लागते आणि मग ज्या सरकारला चर्चा करण्यासाठी एक दिवसही वेळ नसतो त्या सरकारचे प्रतिनिधी दिवसरात्र एक करून संप मोडून काढतात.

सरकारचा प्रत्येक मंत्री आज सामान्य माणसाशी गुर्मीत वागतो. आम्ही भरभरून मते देऊन ही मस्तीची ताकद तुम्हाला दिली आहे. 'लकवा मारलेले सरकार' नको म्हणून भाजपाचे सरकार आणले तर हे 'संप तोडू सरकार' निघाले. हा सरकारचा सन्मान नसून मग्रुर आणि निष्क्रिय सरकारला दिलेली ही शिवी आहे. गेली ३ वर्षे हे सरकार सामान्य माणसांची मन की बातच विसरले आहे. गेली ३ वर्षे हे सरकार फक्त आणि फक्त आपली राजकीय ताकद वाढविण्याच्या मागे लागले आहे. मात्र जनतेतील असंतोषाचे परिणाम यांना माहीत नाहीत. या असंतोषाचा स्फोट होण्याचा क्षण जवळ आला आहे.